## भगिनी निवेदिता ( १५० वे जयंती वर्ष )

भगिनी निवेदिता या स्वामी विवेकानंदांच्या शिष्या. आपल्या जनसेवेसाठी व राष्ट्रकार्यासाठी जगभरात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांचे मुळ नाव मार्गारेट नोबेल व मुळगांव इंग्लंड मधील अलस्टर. वडील सॅम्युअल रिचर्ड नोबल हे धर्मोपदेशक होते व आई मेरी इसाबेल नोबल या गृहीणी.

त्यांचा जन्म २४ ऑक्टोंबर १८६७ ला झाला व त्यानंतर त्यांचे कुटुंब मँचेस्टरला स्थाईक झाले. आपल्या लहाणपणी वडीलांसोबत त्या कामगारांच्या वस्तीत जात व तेथील मुलांसोबत सहजपणे मिसळत असत. एक दिवस त्यांच्या घरी एक धर्मोपदेशक ( फादर ) आले व त्यांनी सांगीतले की, "एक दिवस हिला ईश्वराचा आदेश येईल व त्याचे कार्य करण्यासाठी हिंदुस्थानात जावे लागेल." फादरची भविष्यवाणी ऐकूण मार्गारेटच्या आई वडीलांना अत्यंत आनंद झाला.

बालपणी त्यांना संगीत, चित्रकला व विज्ञानाची आवड होती. त्यावेळी त्यांना धर्म काय आहे ? शाश्वत सत्य कोणते ? मृत्यूनंतर काय ? असे प्रश्न पडत व त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करीत. वडीलांच्या मृत्युनंतर १७ व्या वर्षी त्या लंडनला आल्या व एका शाळेत शिक्षिकेची नोकरी करू लागल्या. तेथे त्यांनी आयर्लंड च्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला व "सिनफेन" या क्रांतीकारी संघटनेच्या सदस्य बनल्या. त्याच काळात स्वामी विवेकानंद यांचे शिकागोच्या धर्म परिषदेतील भाषण सर्वत्र गाजले होते. हिंदु तत्वज्ञान समजून घेण्यासाठी त्यांना जगभरातुन निमंत्रणं येत होती व स्वामीजी ही सर्व ठिकाणी जात असत. स्वामी विवेकानंदांच्या प्रवचनांबद्दल वर्तमान पत्रातुन वाचून मार्गारेटला हिंदु तत्वज्ञान समजुन घेण्याची व स्वामीजींना भेटण्यात ओढ निर्माण झाली व लंडनमध्येच २२ ऑक्टोबर १८९५ ला त्यांची प्रथमच विवेकानंदांशी भेट झाली. त्या प्रवचनात स्वामीजींनी तरूणांना आवाहन केले होते की, "जगाच्या सेवेसाठी त्यागी युवकांची आवश्यकता आहे व या कार्यासाठी आपले जिवन अर्पण करण्यासाठी किती जण तयार आहेत ?"

या आवाहनाने मार्गारेट भारावुन गेल्या व पुढे त्यांनी स्वामीजींची अनेक प्रवचने ऐकली, त्यांना अनेक प्रश्न विचारले. सर्व शंकांचे निरसन झाल्यावर त्यांनी स्वामीजींचे शिष्यत्व पत्कारले व त्यांच्या कार्यासाठी हिंदुस्थानात जाण्याचा निर्णय घेतला. वयाच्या २८ व्या वर्षी दि.२८ जानेवारी १८९८ ला त्या भारतात आल्या व त्यावेळी त्यांचे उद्‌गार होते धन्य, "धन्य ! मी भारतात आले !"

Scanned by CamScanner

कलकत्याच्या रामकृष्ण मठात स्वामी विवेकानंदांनी त्यांना दिक्षा दिली व आपले सर्वस्व परमेश्वराच्या चरणी निवेदित करणारी म्हणून त्यांचे नांव "निवेदिता" ठेवले. कलकत्याला त्या काळातील स्त्री शिक्षणाची गरज ओळखून त्यांनी बालिका विद्यालयाची स्थापना केली. विद्यालयासाठी देणगी गोळा करीत असतांना एका खिश्चन स्त्रीने आपली सर्व संपत्ती देवू पण शिक्षण मात्र खिश्चन कल्पनांनुसार द्यावे ही अट घातली तेंव्हा निवेदितांनी त्यांना स्पष्ट नकार दिला.

हिंदुस्थानाबाबत त्यांचा विचार होता की, देशाच्या प्रगतीसाठी स्वातंत्र्य हवे परंतु त्याकाळी लोकांना पारतंत्र्यच गोड वाटु लागाले होते म्हणून लोकजागरणासाठी त्यांनी देशभर दौरे केले व "आपण या राष्ट्राचे घटक आहोत व या सनातन राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करून आपण स्वामी विवेकानंदांना श्रध्दांजली अर्पण करू." हे एकच सुत्र आपल्या सर्व भाषणांमध्ये मांडले. महाविद्यालयीन तरूणांना व महीलांना त्यांचा संदेश असे की, पाश्चिमात्यांचे अनुकरण करू नका. आपली गौरवशाली परंपरा कुठेही कमी नाही. जे जे भारतीय आहे त्याचा अभिमान बाळगा.

निवेदितांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाला यावे असे गोपाळ कृष्ण गोखलेंना वाटत होते तेंव्हा निवेदितांनी त्यांना उत्तर दिले की, "फक्त ठराव करण्याने स्वातंत्र्य मिळणार नाही. प्रत्यक्ष काम करण्याची ताकद संघटनेमध्ये असली पाहीजे." त्या जहाल देशक्रांतीच्या पाठीराख्या होत्या व स्वतः अनुशिलन समितीच्या सक्रीय कार्यकर्त्या होत्या. त्याकाळी कार्यरत सर्व छोट्या क्रांतीकारी संघटनांना एकत्र आणून त्यांनी बंगालमध्ये क्रांतीची लाट निर्माण केली ज्याचा प्रभाव महाराष्ट्र व पंजाबमधील क्रांती कार्यावर देखील पडला.

स्वदेशी आंदोलन हे निवेदितांचे एक महत्त्वाचे कार्यक्षेत्र होते. विदेशी वस्तुंचा वापर गोहत्येइतकाच वाईट आहे असे त्या म्हणत. त्या स्वतःही खादी वापरत व इतरांना त्यासाठी प्रोत्साहीत करीत. त्यांनी ठिकठिकाणी स्वदेशी वस्तुंची दुकाने काढली व काही तरूणांना उद्योग उभारणी व विदेशातुन तंत्रज्ञान शिकण्यासाठी निधी उभारून दिला.

त्यांनी आपल्या विद्यार्थिनींकडून कल्पनापुर्वक हिंदुस्थानाचा राष्ट्रध्वज तयार करून घेतला ज्यात भगव्या आयताकृती कपडयावर मधोमध पिवळ्या रंगाचे वज्र होते व त्याखाली लिहीले होते. "वंदे मातरम् । यतो धर्मस्ततो जयः ।"

स्वातंत्र्य चळवळी सोबतच जनसेवेची त्यांची धडपड अखंड चालु होती व या धावपळीचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर होऊन त्या आजारी पडल्या व वयाच्या ४४ व्या वर्षी दि. १३ ऑक्टोंबर १९११ या दिवशी त्यांनी देह ठेवला. दार्जिलिंग येथील त्यांच्या समाधीवर कोरलेले शब्द आहेत, "आपले सर्वस्व भारतमातेच्या चरणी ज्यांनी अर्पण केले या भगिनी निवेदिता येथे समाधिस्थ आहेत."

Scanned by CamScanner